
सुवर्णसंधी सभासद अभियान
वाढदिवस तुमचा, शुभेच्छा आमच्या...
सा.प्रगत भारत वृत्तपत्राचेआजच सभासद व्हा..मो.नं.९८६०८७७७८९

साप्ताहिक
# प्रगत भारत
..वर्ष १९ वे
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,,mo.9860877789




• वर्ष:१९ • अंक क्र.०५ • साप्ताहिक • मंगळवार दि.२१ ते २७ जुलै २०२६ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP/पोस्ट-PCE/006/2024-2026 • पृष्ठे-४ • किंमत:२.००

## क्वांटमकॉम्पुटिंग,डीपटेकटेक्नॉलॉजीशी जुळवून घेण्यासाठी परिसंस्था निर्माण करणार:

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित कार्यक्रमात राज्याचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्गदर्शन केले




**पुणे:सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे झालेल्या इंटर ॲक्शन वुईथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉरमेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरींग हब ॲण्ड फ्रंटीयर टेक इन्स्टिट्यूट कार्यक्रमात मार्गदर्शन करताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुलगुरु डॉ.सुरेश गोसावी आदी यावेळी उपस्थित होते.**

**पुणे:क्वांटम कॉम्पुटिंग आणि डीप टेक टेक्नॉलॉजीने आज संपूर्ण जगामध्ये एक मोठी क्रांती घडवून आणली आहे.या तंत्रज्ञानाने केलेल्या अफाट वाढीशी,त्याच्या वेगाशी त्वरेने जुळवून घेणे आवश्यक आहे,त्यासाठी परिपूर्ण अशी इकोसिस्टिम (परिसंस्था) निर्माण करणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे झालेल्या इंटर ॲक्शन वुईथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉरमेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरींग हब ॲण्ड फ्रंटीयर टेक इन्स्टिट्यूट कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुलगुरु डॉ.सुरेश गोसावी, महाराष्ट्र राज्य 'मित्रा'चे दीपक करंजीकर,ॲलिकॉन कॅस्टलॉयचे हर्ष गुणे,लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोळकर,ॲक्टीन टेक्नॉलॉजीचे विकास महाजन,बिग्रेडीयर सचिन कालिया,स्टॅटरजिक रिसर्च ॲण्ड ग्रोथ फाऊंडेशनचे वरुण खंदारे, सिम्बॉयसिसच्या प्र.कुलगुरु डॉ. स्वाती मुजूमदार,माजी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर,रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ.अपूर्वा पालकर,महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडिस्ट्रिज ॲण्ड ॲग्रीकल्चरचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत गिरबणे,इंडियन इस्टिट्यूट ऑफ सायन्स ॲण्ड रिसर्चचे प्रसन्नजित फडणवीस,पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.प्रफुल्ल पवार,टाटा स्टिल लि.चे माजी उपाध्यक्ष सी.आर.कुलकर्णी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,या तंत्रज्ञानाचा जागतिक स्तरावरील वाटा २०२४ मध्ये जवळपास २ ते ३ ट्रिलियन डॉलर्स होता, जो पुढील पाच वर्षांत सुमारे १६ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचेल.मानवी इतिहासात आपण यापूर्वी कधीही अशी गती आणि वाढ पाहिलेली नाही.त्यामुळे आपल्याला या विकासाच्या प्रवासाचा एक महत्त्वाचा भाग व्हावेच लागेल.मुख्यमंत्री म्हणाले,संयुक्त राष्ट्रांच्या फ्रंटियर टेक्नॉलॉजी इंडेक्सकडे पाहताना भारत यामध्ये चांगली कामगिरी करताना दिसत आहे.आपण सध्या ३६ व्या क्रमांकावर असलो,तरी आपली गणना **(पान २ वर)**

## सायबर सेलचे एपीआय प्रवीण स्वामी व पीएसआय शशिकांत गाडेकर,यांचे सा.प्रगत भारत वृत्तपत्रकास हार्दिक शुभेच्छा




**पुणे:**संत तुकाराम नगर पोलीस स्टेशनचे पीएसआय शशिकांत गाडेकर,व पिंपरी-चिंचवड शहर सायबर सेलचे एपीआय प्रवीण स्वामी,यांची नुकतीच एका कार्यक्रमात भेट झाली.

यावेळी सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे यांनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन अंक दिला व सा.प्रगत भारत वृत्तपत्र १८ वर्ष नियमित प्रकाशित होत असून १९ व्या वर्षात पदार्पण करत असल्याचे सांगितले.यावेळी पीएसआय शशिकांत गाडेकर व सायबर सेलचे एपीआय प्रवीण स्वामी यांनी वत्तपत्रकास शुभेच्छा दिल्या.




## टाळगाव चिखली येथील पाटील नगर येथील प्रति दुर्गा टेकडी मध्ये डुकरांचे कळप;

### भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न; महापालिकेने तातडीने उपाययोजना करावी

**चिखली:**टाळगाव-चिखली प्रभाग क्रमांक १ मधील धर्मराजनगर रोड लगत असलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'प्रति दुर्गा टेकडी' वनीकरण परिसरात भटक्या डुकरांचे कळप मोठ्या प्रमाणात फिरत असल्याचे समोर आले आहे. यामध्ये लहान पिल्लांसह अनेक डुकरे दिसत असल्याने सकाळी आणि सायंकाळी वॉकिंग ट्रॅकवर चालण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



**चिखली:टाळगाव-चिखली प्रभाग क्रमांक १ मधील धर्मराजनगर रोड लगत असलेल्या महापालिकेचे'प्रति दुर्गा टेकडी' मध्ये परिसरात भटक्या डुकरांचे कळप फिरत असल्याचे वरील छायाचित्रात पहावयास मिळत आहे.**

प्रति दुर्गा टेकडी परिसरात महापालिकेने मोठ्या प्रमाणात वनीकरण केले असून नागरिकांसाठी पायवाट आणि वॉकिंग ट्रॅक तयार करण्यात आला आहे. परिसरातील धर्मराजनगर, पाटीलनगर आणि आसपासच्या भागांतील अनेक नागरिक नियमितपणे येथे फिरण्यासाठी येतात.टेकडीच्या जवळच पीएमपीएमएल बसथांबा आणि संतपीठाची मोठी शाळा असल्याने विद्यार्थी, पालक,प्रवासी आणि स्थानिक नागरिकांची मोठी वर्दळ असते.प्रत्यक्ष छायाचित्रांमध्ये वनीकरण परिसरातील कचऱ्याच्या ठिकाणी अनेक डुकरे अन्न शोधताना दिसत आहेत. काही ठिकाणी प्लास्टिक, खाद्यपदार्थांची पाकिटे आणि इतर कचरा मोठ्या प्रमाणात साचलेला आहे. या कचऱ्यामुळे डुकरांचे कळप परिसरात आकर्षित होत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, टेकडीच्या आतील भागात काही व्यक्तींकडून मांसाहारी पदार्थांचे अवशेष आणि खाद्यपदार्थ **(पान ३ वर)**

## पुणे शिरुर, तळेगाव चाकण शिक्रापूर व हडपसर यवत या ३ उन्नत मार्ग प्रकल्पांचे भूमिपूजन संपन्न




**पुणे:**पुणे शहर हे भविष्यातील अत्याधुनिक तंत्रज्ञान (डीप टेक) आणि जागतिक क्षमता केंद्रांचे (जीसीसी) प्रमुख केंद्र बनण्याच्या मार्गावर असून सन २०३० पर्यंत पुणे हे देशातील अत्यंत आधुनिक शहर व प्रमुख विकास केंद्र (ग्रोथ इंजिन) म्हणून नावारूपाला येईल,असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

शहराची वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी राज्य शासनाने पुणे-शिरूर,तळेगाव-चाकण-शिक्रापूर आणि हडपसर-यवत या तीन महत्त्वपूर्ण उन्नत मार्ग प्रकल्पांना गती दिली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून 'बांधा,वापरा व हस्तांतरित करा' तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या या नाविन्यपूर्ण प्रकल्पांतून शासनाला अनुक्रमे ५००,३०० आणि १५० कोटी असा एकूण ९५० कोटी रुपयांचा आगाऊ निधी प्राप्त होणार आहे.या प्रकल्पांमुळे पुण्याची वाहतूक कोंडीची समस्या दूर होईल, असेही ते म्हणाले.

गणेश कला क्रीडा मंच येथे पुणे शिरुर,तळेगाव चाकण शिक्रापूर, हडपसर यवत या ३ उन्नत मार्गांच्या प्रकल्पांच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय परिवहन व रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,राज्यमंत्री माधुरी मिसाळ,खासदार श्रीरंग बारणे,पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे,पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे आदी उपस्थित होते.(पान २ वर)






ॐ कारं बिन्दू संयुक्त नित्यं धायन्ति योगिना:।।कामद मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम :।।

# संपादकीय

## ‘पेपर’फूटीमुळे आंदोलाचे पडसाद सर्वत्र..

**भारत देशामध्ये होत असलेली शिक्षणाची प्रगती व त्यांच बरोबर होत असलेले नवनवीन शिक्षणप्रणालीचे विद्यापीठ यामधून असे दिसते की नक्की येणारी आपल्या भारत देशाती तरूण पीढी ही कोणत्या दिशेने पाऊल उचलत आहेत याकडेही लक्ष देणे महत्वाचे वाटत आहे.भारतासारख्या लोकशाही देशामध्ये किरकोळ कारणावरून एखाद्या घटनेनंतर नैतिक जबाबदारी स्वीकारून मंत्रिपदाचा राजीनामा देण्याचा मोठा इतिहास असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमधील मंत्री मात्र राजीनामा देण्याचा विचारही करत नाहीत देशभरात सध्या दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनाची चर्चा आहे. गेल्या महिन्याभरापासून दिल्लीतील जंतर मंतर येथे नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाचे पडसाद सर्वत्र उमटत असून आंदोलनाची व्याप्ती आता देशभरातील राज्यांमध्ये वाढताना दिसत आहे.आणि आंदोलनकर्त्यांकडे जाऊन चर्चाही करत नाहीत.अभिजीत दिपके यांनी केलेले आंदोलन असो किंवा सोनम वांगचुक यांचे उपोषण असो किंवा देशाच्या कानाकोपऱ्यात धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा मागणीसाठी झालेली आंदोलने असोत, सरकारने कोणत्याच पातळीवर त्याची दखल घेतलेली नाही.रेल्वेच्या तांत्रिक चुकीमुळे रेल्वे अपघात झाल्यानंतर तत्कालीन रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला होता हे सर्वात आदर्श उदाहरण मानले जाते. तर भारत-चीन युद्धामध्ये भारताचा पराभव झाल्यामुळे तत्कालीन संरक्षण मंत्री कृष्णमेनन यांनीसुद्धा आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्याच कालावधीमध्ये एलआयसीतील गुंतवणुकीबाबत एक वादग्रस्त विषय समोर आल्याने तत्कालीन अर्थमंत्री टी कृष्णाम्माचारी यांनीही आपले पद सोडले होते. राजीव गांधी यांच्या कारकिर्दीमध्येसुद्धा अर्थमंत्री विश्वनाथ प्रताप सिंग यांनी एका कथित घोटाळ्यानंतर आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर तत्कालीन गृहमंत्री शिवराज पाटील आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनीसुद्धा नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला होता. महाराष्ट्राचे गृहमंत्री असताना आर आर पाटील यांच्या तोंडून अनावधानाने काही चुकीची वाक्ये बाहेर पडल्यानंतर त्यांनीही आपल्या पदाचा राजीनामा देऊन नैतिकतेचे प्रदर्शन केले होते. अशी अनेक उदाहरणे समोर असतानाही ज्या प्रकारे विद्यमान शिक्षण मंत्री पेपर फुटीच्या प्रकरणाकडे उदासीन वृत्तीने पाहत आहेत ते निश्चितच निषेधार्ह आहे. मोदी सरकारने कदाचित मंत्र्यांचे राजीनामे कोणत्या परिस्थितीत न घेण्याचे धोरण स्वीकारले असेल तर किमान संबंधित आंदोलनकर्त्यांबरोबर चर्चा करण्याचा पर्यायही स्वीकारला जात नाही हे जास्त दुःखद आहे. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला वीस दिवस पूर्ण झाल्यानंतरसुद्धा कोणताही सरकारी प्रतिनिधी त्यांच्याकडे चर्चेसाठी आला नाही. पण अशा प्रकारची चर्चा झाली असती तर सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा समारोप तरी करता आला असता. पण तसे न करता उलट सरकारने बळाचा वापर करून यांना रुग्णालयात दाखल केले. २० जुलैपासून संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे आणि याच दिवशी देशातील सर्व विरोधी पक्षांच्या पुढाकाराने संसदेवर मोर्चाही काढण्यात येणार आहे. या गोष्टी समोर ठेवूनच कदाचित विरोधकांच्या आंदोलनाची धार बोथट करण्यासाठी सोनम वांगचुक यांना बळजबरीने अटक करून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.या सर्व घडामोडी देशातील नागरिक पहात आहेत आणि चर्चाही करत आहेत, याकडे सरकारने दुर्लक्ष करता कामा नये. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यामुळे सर्व शैक्षणिक प्रश्न सुटतील असेही नाही. पण किमान जबाबदारी स्वीकारल्याच्या निमित्ताने मंत्र्यांच्याकडे असलेली संवेदनशीलता तरी समोर येईल. पण कोणत्याही आंदोलकांपुढे झुकायचे नाही अशीच भूमिका सरकारने घेतली आहे.आंदोलन कितीही चिघळले आणि कितीही लांबले तरी त्यांच्या मागण्या मान्य करायच्या नाहीत आणि ते आंदोलन आपोआपच विसर्जित कसे होईल हे पाहायचे अशाच प्रकारचे काम सरकारतर्फे केले जात आहे.यावेळी सुद्धा तसेच होत आहे. अभिजीत दिपके यांच्या पुढाकाराने सुरू झालेले आंदोलन व्यवस्थित होऊन दिले,कारण आम्ही आंदोलन करण्यास विरोध करत नाही हेच दाखवण्यामागे त्यांची भूमिका होती. आंदोलन ज्या कारणासाठी केले जात आहे त्या कारणाकडे मात्र सरकार संपूर्णपणे दुर्लक्ष करत आहे हे विसरून चालणार नाही.आता तर सरकार दुहेरी कात्रीत सापडले आहे. कारण यापुढे जर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला तर ते विरोधकांच्या आंदोलनाचे यश मानले जाणार आहे. दुसरीकडे जोपर्यंत धर्मेंद्र प्रधान आपले पद सोडत नाहीत तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार आहे हे सुद्धा उघड आहे. साहजिकच हा विषय एवढा वाढू देण्यास सरकारच जबाबदार आहे.आंदोलनाच्या निमित्ताने विरोधकांची एकी समोर आली आहे आणि संसदेच्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर या सर्व घटना घडत असल्याने या अधिवेशनामध्ये काय घडते हे पाहणेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे. देर आये लेकिन दुरुस्त आये या न्यायाचा विचार करता सरकारने आता तरी नैतिकतेचे भान ठेवून धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला तरच या आंदोलनाला आणि त्यानिमित्ताने निर्माण झालेल्या लोकक्षोभाला पूर्णविराम मिळू शकेल.**

## ..पुण्याची वाहतूक कोंडी व प्रदूषणाचा प्रश्न सुटणार-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

(पान १ वरून)

‘तीन उन्नत मार्गांमुळे पुण्याची वाहतूक कोंडी व प्रदूषणाचा प्रश्न सुटणार-‘ केंद्रीय मंत्री नितीन गडकरीकेंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले,पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी पान क-१ पआणि प्रदूषणाची गंभीर समस्या दूर करण्यासाठी पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर आणि हडपसर-यवत हे तीन उन्नत मार्गांचे प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादनाची मोठी अडचण असल्याने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हे उन्नत मार्ग उभारले जात आहेत. या तिन्ही प्रकल्पांच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होत असून, त्यामुळे पुण्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या प्रकल्पांच्या उभारणीसाठी राज्य शासनाने दिलेल्या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल गडकरी यांनी समाधान व्यक्त केले. या प्रकल्पांमध्ये वापरण्यात येणाऱ्या पोलाद आणि सिमेंटवरील राज्य शासनाच्या हिश्श्याचा वस्तू व सेवा कर माफ करण्यात आला आहे.तसेच,वाळू,खडी आणि अन्य बांधकाम साहित्यावरील स्वामित्व धन माफ करण्याबरोबरच भूसंपादन प्रक्रियेलाही शासनाने मोठे सहकार्य केले आहे.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळेच या प्रकल्पांना अपेक्षित गती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.रस्ते आणि पुलांच्या बांधकामात जागतिक दर्जाच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जात असल्याचे श्री.गडकरी यांनी सांगितले.

मलेशियामध्ये विकसित करण्यात आलेल्या ‘अल्ट्रा हाय परफॉर्मन्स फायबर रिइन्फोर्समेंट काँक्रिट’ या तंत्रज्ञानामुळे पुलांतील दोन खांबांमधील अंतर ३० मीटरवरून १२० मीटरपर्यंत वाढविणे शक्य झाले आहे. त्यामुळे खर्चात बचत होण्याबरोबरच एकाच खांबावर रस्ता, पूल आणि मेट्रो अशी अत्याधुनिक रचना उभारता येणार आहे. पुलांची सुरक्षितता आणि गुणवत्ता अबाधित राहण्यासाठी रबरी बेअरिंग्ज व एक्स्पान्शन जॉइंट्सच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड करू,अशा स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांना दिल्या.

नाशिक फाटा ते खेड या ३० किलोमीटर लांबीच्या सुमारे ८ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, भूसंपादन पूर्ण होताच कामाला सुरुवात केली जाईल. खंबाटकी घाटातील नवीन बोगद्याचे काम अंतिम टप्प्यात असून, त्याचे उदघाटन लवकरच करण्यात येणार आहे. तसेच, जुन्या मुंबई-पुणे मार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी ठाणे ते पुणे आणि पुढे शिरूरमार्गे छत्रपती संभाजीनगरपर्यंत जोडणाऱ्या सुमारे १५ हजार कोटी रुपयांच्या नव्या महामार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.पुण्याच्या विकासाला नवी गती देणारे मार्ग ‘गेम चेंजर‘ ठरतील

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारउपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, पुण्याचा वाढता विस्तार आणि त्यामुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर व हडपसर-यवत या तीन उन्नत महामार्ग प्रकल्पांमुळे पुण्याच्या विकासाला नवी गती मिळेल आणि हे मार्ग खऱ्या अर्थाने ‘गेम चेंजर’ ठरतील. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्व व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागल्याचे त्यांनी नमूद केले. पुणे मेट्रो,रिंग रोड,विमानतळाच्या नवीन टर्मिनलचा विस्तार,नाशिक फाटा ते राजगुरूनगर उन्नत महामार्ग हा पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उत्तर महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असल्याचे सांगून, भूसंपादनातील तांत्रिक अडचणी दूर करून हा प्रकल्पही लवकरात लवकर मार्गी लावावा, अशी सूचना उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी केली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले की, पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर व हडपसर-यवत या तीन महत्त्वाकांक्षी उन्नत मार्ग प्रकल्पांमुळे पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. देशाला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था व महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यावर शासनाचा भर असून, बदलत्या हवामानालाही तोंड देऊ शकणारी दर्जेदार कामे करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येला, औद्योगिक विकासाला, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या विस्ताराला व शिक्षणासाठी येणाऱ्या नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन भविष्योन्मुख नियोजन करण्यात येत आहे. सासवड-पुरंदर विमानतळ, वाढती वाहतूक व शहराचा विस्तार विचारात घेऊन पुण्याला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याचे उद्दिष्ट आहे. शहरात ३०० किलोमीटरहून अधिक लांबीच्या सायकल मार्गांच्या विकासालाही गती देण्यात येणार असल्याचे मंत्री भोसले म्हणाले.या प्रकल्पांमध्ये चौपदरी, सहापदरी व उन्नत मार्गांचा समावेश असून, हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक लांबीचा उन्नत मार्ग निर्माण होईल, असेही त्यांनी सांगितले. तसेच राज्याने उभारलेल्या विविध पायाभूत सुविधांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही वेगळी ओळख निर्माण केल्याचे मंत्री भोसले यांनी नमूद केले.यावेळी आमदार उमा खापरे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, विक्रम काकडे, भीमराव अण्णा तापकीर, राहुल कुल, बापूसाहेब पठारे, सुनील कांबळे, चेतन तुपे, सुनील शेळके, बाबाजी काळे, हेमंत रासने, शंकर मांडेकर, शंकर जगताप, ज्ञानेश्वर कटके, विभागीय आयुक्त शीतल तेली उगले, पुणे मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम आदी उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित यांनी प्रास्ताविक केले.

**तिन्ही रस्ते प्रकल्पाचे वैशिष्ट्य:**

पुणे शिरूर महामार्ग प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय महामार्ग ७५३ एफ वरील सुमारे ५४ किलोमीटर मार्गाचा विकास करण्यात येणार आहे. या प्रकल्पात पहिल्या ३१ किलोमीटरमध्ये सहा पदरी उन्नत महामार्ग, तर स्थानिक वाहतुकीसाठी समांतर चार पदरी रस्ता विकसित केला जाणार आहे. उन्नत महामार्गाच्या सुरुवातीच्या सात किलोमीटर भागात भविष्यातील मेट्रो मार्गासाठीही तरतूद करण्यात आली आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे ते शिरूर प्रवासाचा कालावधी सुमारे दीड ते दोन तासांवरून ४५ ते ५० मिनिटांपर्यंत कमी होणार असून, वाहतूक अधिक सुरक्षित आणि गतिमान होईल.हडपसरयवत महामार्ग प्रकल्पाची एकूण लांबी सुमारे ३१.५ किलोमीटर असून, त्यामध्ये सुमारे २५ किलोमीटरचा उन्नत बहुस्तरीय महामार्ग आणि सहा पदरी भूपृष्ठावरील रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पात उरुळी कांचनपर्यंत भविष्यातील मेट्रो मार्गासाठीही स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. तसेच हा मार्ग पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ आणि पुणे रिंगरोडशी जोडला जाणार असल्याने वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होऊन प्रवास सुलभ व सुरक्षित होईल.तळेगावचाकणशिक्रापूर कॉरिडॉर हा सुमारे ५३ किलोमीटर लांबीचा महत्त्वाचा प्रकल्प असून, त्याअंतर्गत सुमारे २६ किलोमीटरचा उन्नत बहुस्तरीय महामार्ग आणि ५३.२ किलोमीटर लांबीचा चार पदरी भूपृष्ठावरील रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे जलदगती वाहने आणि स्थानिक वाहतूक स्वतंत्र मार्गाने होणार असल्याने वाहतूक कोंडी कमी होईल. चाकण औद्योगिक परिसर, पुणे रिंगरोड आणि राष्ट्रीय महामार्गांना प्रभावी जोडणी मिळाल्याने औद्योगिक, व्यापारी आणि लॉजिस्टिक क्षेत्राला मोठी चालना मिळणार असून, पुणे परिसरातील वाहतूक अधिक वेगवान, सुरक्षित आणि आधुनिक होणार आहे.

## क्वांटम कॉम्पुटिंग,डीप टेक टेक्नॉलॉजीशी जुळवून घेण्यासाठी परिसंस्था निर्माण करणार:

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन केले

(पान १ वरून)

अपेक्षेपेक्षा सरस कामगिरी करणारे म्हणून केली जात आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून आपण या क्षेत्रात उत्तम काम करत आहोत. या तंत्रज्ञानाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी आपण करत असलेले प्रयत्न सध्या विखुरलेले आणि वैयक्तिक पातळीवर अधिक केंद्रित असले,तरी आपण या प्रयत्नांचे संस्थात्मकीकरण केले, तर संपूर्ण चित्र बदलू शकते. आज सिलिकॉन, एआय कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्वाँटम कॉम्पुटिंग जग बदलून टाकणाऱ्या आहेत असे सांगून ते म्हणाले, आपल्या व्यवसायाचा प्रत्येक भाग या तीन गोष्टींमुळे सकारात्मक, नकारात्मक किंवा क्रांतिकारी पद्धतीने प्रभावित होणार आहे. त्यासाठी मजबूत इकोसिस्टीम (परिसंस्था) तयार करावी लागेल अन्यथा आपण काळाच्या ओघात मागे पडू.विशेषतः उत्पादन क्षेत्रात आपली सर्वात मोठी ताकद असणारे आपले एमएसएमई उद्योग निधीची कमतरता आणि क्षमतांसह इतर अनेक गोष्टींच्या अभावामुळे या तंत्रज्ञानाचा लाभ घेऊ शकत नाहीत. सर्वांगीण विकासासाठी इकोसिस्टीम तयार करायची असेल,तर सर्वांना सहज उपलब्ध असणारे स्मार्ट सुविधा आणि प्लॅटफॉर्म्स निर्माण करावे लागतील.आणि या स्मार्ट व्यवसायांच्या गरजा पूर्ण करू शकणारे सक्षम मनुष्यबळ तयार करावे लागेल.महाराष्ट्राला जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनवण्यासाठी,या तंत्रज्ञानामध्ये आपल्याला मोठ्या प्रमाणावर सर्वसमावेशकता आणावी लागेल.त्यासाठी अशा विशिष्ट तंत्रज्ञानाला समर्पित असणारी संस्था उभारणे अत्यंत आवश्यक आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.केंद्र सरकारच्या क्वाँटम तंत्रज्ञानासंबंधीच्यायोजना आधीच सुरू झाल्या असल्याचे सांगून आपण आपल्या प्रयत्नांना केंद्र सरकारच्या या उपक्रमांशी सुसंगत करणे गरजेचे आहे.त्यासाठी राज्य शासनाला या तंत्रज्ञानामध्ये काम करणाऱ्या संस्थेची गरज तीव्रतेने जाणवत आहे.

‘मित्रा’ या दिशेने विचार करत आहे आणि काम करत आहे. स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि डीप टेकसाठी एक ठोस धोरणात्मक चौकट तयार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित येऊन धोरणांचे संस्थात्मक एकत्रिकरण करण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी व्यक्त केली.

मुख्यमंत्री म्हणाले,अधिकाधिक लोकांना याचा लाभ घेता यावा यासाठी नवीन सुविधा आणि प्लॅटफॉर्म्सच्या बाबतीत शासन गुंतवणूक करण्यास पूर्णपणे तयार आहे.मित्रा’ने ठरवल्याप्रमाणे, आपल्याला क्वाँटम कम्प्युटिंगच्या प्रशिक्षकांचा एक मोठा गट तयार करायचा आहे,जे पुढे इतरांना प्रशिक्षित करतील.पुढील दोन तीन वर्षांत क्वाँटम कम्प्युटिंग क्षेत्रात किमान पाच हजार लोकांना प्रशिक्षित करण्याचे ध्येय असल्याचेही त्यांनी सांगितले.

सध्या वेगवेगळ्या पातळीवर होत असलेले हे सर्व प्रयत्न एकत्र आणून त्यांचे संस्थात्मकीकरण केले जाऊ शकते. त्या दृष्टीने इंटरॅक्शन विथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉर्मेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरिंग हब अँड फ्रंटीयर टेक इन्स्टिट्यूट हा खरोखरच एक उत्तम उपक्रम आहे. मुंबईमध्ये विकसित होत असलेल्या ‘इनोव्हेशन सिटी’ साठी शासनाने टाटा समूहाशी भागीदारी केली असून ते सध्या या इनोव्हेशन सिटीचा संपूर्ण आराखडा तयार करत आहेत. एफटीआयचा हा उपक्रम इनोव्हेशन सिटीच्या संकल्पनेशी तंतोतंत जुळणारा आहे, त्यामुळे आपण यामध्येही एकत्र काम करू शकतो, असेही त्यांनी या विषयासाठी विविध क्षेत्रातील जमलेल्या तज्ञांशी बोलताना सांगितले.यावेळी उपस्थित तज्ज्ञांनी विविध क्षेत्रांमध्ये क्वाँटम तंत्रज्ञानाचा असलेला स्कोप याबद्दल चर्चा केली. हर्षवर्धन गुणे यांनी प्रास्ताविक केले, विकास महाजन यांनी आभार मानले.

प्रगत भारत हे साप्ताहिक वृत्तपत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक संपादक दत्तात्रय तानाजी कांबळे. यांनी त्रिमुर्ती मुद्रिका,५४/२६ एम.आय.डी.सी.चिंचवड पुणे-१९ येथे छापून रजि.मुख्य कार्यालय ऑ.नं.२४,साईकृपा भवन, पहिला मजला, पुणे-मुंबई रोड, खराळवाडी, पिंपरी, पुणे-१८ येथून प्रकाशित केले.संपर्क मो. ९८६०८७७७८९, Web:www.pragatbharat.com सदर अंकात प्रसिध्द झालेल्या वृत्तांशी किंवा लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व कायदेशिर बाबी पिंपरी न्यायालयाअधिन.(पी.आर.बी.कायद्यानुसार जबाबदारी)● RNI No. MAH/MAR/2008/25149 ● Dec. No. PHM/SR/136/VIII/2008 Published on Tuesday and Posted on Thursday
POSTED AT PIMPRI P.F. POST OFFICE LICENCE NO. Reg. No. PCE/006/2024-2026'pragat Bharat' Weekly News paper is owned,printer & Published by Dattatraya Tanaji Kamble,Printed at shree Trimurti Mudrika 54/26,D-2 lockMIDC,Chinchwad,Pune-411018 ● Editor:Dattatraya kamble Email - pragatbharat@gmail.com, Web:www.pragatbharat.com ●RNI No. MAH/MAR/2008/25149 ● legal disputes under pimpri court jurdion



## शहर व उपनगर वार्ता वाहतूक कोंडीवर आधुनिक उपाय; पिंपरी-चिंचवडमध्ये स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या प्रयत्नांना यश स्थायीच्या मंजुरीनंतर डीपीआर तयार करण्याचा प्रश्न सुटणार

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com




**पिंपरी:-पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून नाशिक महामार्ग ते वाकड या मार्गावर इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टिम (इआरटीएस) प्रकल्प राबविण्यात येणार आहे.पिंपरी-चिंचवड महापालिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या मंजुरीनंतर सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याच्या प्रक्रियेला गती मिळणार आहे.**

**त्यामुळे भविष्यात शहरातील नागरिकांना जलद, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीचा आधुनिक पर्याय उपलब्ध होणार आहे.राज्य शासन स्तरावर ११ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी मेट्रो,मेट्रो निओ,बीआरटीएस आणि इआरटीएस या पर्यायांचा सविस्तर आढावा घेण्यात आला होता.**

बीआरटीएसला नागरिकांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने भविष्यातील सार्वजनिक वाहतुकीसाठी इआरटीएस हा अधिक सक्षम आणि आधुनिक पर्याय असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले होते.या निर्णयानंतर महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन (महामेट्रो) मार्फत इआरटीएस प्रणाली किती योग्य याची तपासणी करण्यात आली. त्यासाठी सल्लागार नेमण्यासह सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली.

यासंदर्भात महापालिका प्रशासन, महामेट्रो आणि राज्य शासन यांच्यात अनेक स्तरांवर चर्चा झाली. दरम्यान, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी हा विषय सातत्याने लावून धरत शहराच्या भविष्यातील वाहतूक नियोजनासाठी इआरटीएस प्रकल्पाला प्राधान्य देण्याची भूमिका घेतली. त्यांच्या पाठपुराव्यानंतर हा विषय स्थायी समिती सभेसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात आला.या मार्गावर ‘‘इआरटीएस’’ सेवामंजूर प्रस्तावानुसार नाशिक महामार्गावरील गोडाऊन चौक-कुदळवाडी चौक-ऑटो क्लस्टर- काळेवाडी फाटा ते जगताप डेअरी चौक- वाकड चौक या मार्गावर ‘‘इआरटीएस’’चा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. हा मार्ग नाशिक महामार्गाला बंगळुरू राष्ट्रीय महामार्गाशी जोडणारा असल्याने भविष्यात शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यास आणि नागरिकांना जलद सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध करून देण्यास मदत होणार आहे. महामेट्रोने सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया राबविली असून या विषयाला स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी मंजुरी दिल्यानंतर शहर सुधारणा आणि महासभेच्या मंजुरी घेतली जाणार आहे.सार्वजनिक वाहतूक सक्षम करणे काळाची गरज अभिषेक बारणेयाबाबत बोलताना स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले, ‘‘पिंपरी-चिंचवड शहराची वाढ लक्षात घेता भविष्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे ही काळाची गरज आहे. इआरटीएस हा अत्याधुनिक, पर्यावरणपूरक आणि जलद प्रवासाचा पर्याय ठरणार आहे. शहराच्या विकासासाठी हा महत्त्वाचा टप्पा असून प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लागावा यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

## विकासनगर, किवळे येथील आरक्षित जागेत सार्वजनिक उद्यान विकसित करा; नगरसेविका ऐश्वर्या तरस

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com



**पिंपरी:-पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १६ मधील विकासनगर,किवळे येथील सर्व्हे क्रमांक ३९,शेजारील आरक्षित मोकळ्या जागेत सार्वजनिक उद्यान विकसित करण्यात यावे,अशी मागणी शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापालिका आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, विकासनगर परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिक वास्तव्यास असून परिसरातील आरक्षित जागा सध्या रिकामी आहे. या भागात लहान मुलांसाठी खेळण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांना सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी, व्यायाम करण्यासाठी आणि विरंगुळ्यासाठी कोणतेही सार्वजनिक उद्यान उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांकडून या ठिकाणी उद्यान विकसित करण्याची मागणी सातत्याने होत आहे.परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तसेच पर्यावरण संवर्धनासाठी या जागेवर सुसज्ज सार्वजनिक उद्यान उभारणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामध्ये मुलांसाठी आधुनिक खेळणी व खेळ साहित्य, ज्येष्ठ नागरिकांसाठी वॉकिंग ट्रॅक व बसण्याची व्यवस्था, पुरेशा प्रमाणात वृक्षारोपण व हिरवळ,आकर्षक सौंदर्यीकरण, एलईडी प्रकाश व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहे,सुरक्षा रक्षक व सीसीटीव्ही व्यवस्था तसेच नियमित देखभाल यांचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली आहे.महापालिकेने संबंधित जागेची तातडीने पाहणी करून आवश्यक प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत सार्वजनिक उद्यान विकसित करण्याची कार्यवाही करावी, अशी विनंती नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी आयुक्तांकडे केली आहे. नागरिकांमध्येही या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून परिसरात दर्जेदार उद्यान उभारले जावे,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## टाळगाव चिखली येथील पाटील नगर येथील प्रति दुर्गा टेकडी परिसरात डुकरांचे कळप; भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न;

(पान १ वरून)

टाकले जात असल्याने डुकरांचा वावर वाढत आहे. हे पदार्थ नेमके कोण टाकत आहे, याची महापालिकेने चौकशी करावी. तसेच डुकरांना या परिसरात जाणीवपूर्वक आणून सोडले जात आहे का, याचाही संबंधित विभागाने तपास करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. डुकरांच्या कळपामुळे अचानक हल्ला होण्याची किंवा नागरिकांचा पाठलाग होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. भविष्यात एखाद्या नागरिकाला दुखापत झाल्यानंतर कारवाई करण्याऐवजी महापालिकेच्या पशुवैद्यकीय, आरोग्य आणि उद्यान विभागाने संयुक्तपणे तातडीची उपाययोजना करावी. डुकरांना कायदेशीर आणि सुरक्षित पद्धतीने पकडून योग्य ठिकाणी हलवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.धर्मराजनगरमध्ये भटक्या कुत्र्यांचाही वाढता उपद्रवधर्मराजनगर कॉलनी क्रमांक एक, दोन आणि तीन परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. कुत्र्यांचे टोळके रस्त्यावर फिरत असल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. महापालिकेने भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण आणि आवश्यक नियंत्रणात्मक कारवाई नियमितपणे करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.वॉकिंग ट्रॅकची दुरुस्ती आणि सुशोभीकरण आवश्यकप्रति दुर्गा टेकडीवरील वॉकिंग ट्रॅकच्या काही भागांची दुरवस्था झाली असून काही ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक खचलेले किंवा विस्कळीत झाले आहेत. ट्रॅकची दुरुस्ती, नियमित स्वच्छता, कचरा उचलणे, पुरेशी प्रकाशव्यवस्था, संरक्षक जाळी आणि परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे. प्रभाग क्रमांक एकमधील लोकप्रतिनिधी आणि महापालिका अधिकाऱ्यांनी या

## डॉ.डी.वाय.पाटील आर्टस कॉमर्स अँड.सायन्स कॉलेज पिंपरी येथे क्किक हिल फौंडेशनच्या वतीने सायबर शिक्षा ते सायबर सुरक्षा उपक्रमाचे यशस्वी आयोजन

### पिंपरी-चिंचवड शहर पोलिसदलातील सायबर सेलचे एपीआय प्रवीण स्वामी यांची उपस्थिती व मार्गदर्शन




विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com

**पिंपरी-डॉ.डी.वाय.पाटील आर्टस कॉमर्स अँड.सायन्स कॉलेज पिंपरी येथील क्किक हिल फौंडेशनच्या वतीने सायबर शिक्षा ते सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत कार्यरत सायबर फसवणुकीचे वाढते प्रकार, कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर आणि जबाबदार डिजिटल नागरिक घडविणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.**

**.कार्यक्रमाची सुरुवात क्लबच्या अध्यक्षा नेहा मडिवालकर यांनी क्लबचा परिचय करून देत केली. त्यांनी क्लबची उद्दिष्टे, कार्यपद्धती तसेच विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.यानंतर निविदा काळे आणि आकाश वाघवाड यांनी बनावट ऑनलाइन कोर्स आणि**

फेक सर्टिफिकेट फसवणूक या विषयांवर मार्गदर्शन केले. ऑनलाइन शिक्षणाच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीची ओळख कशी करावी,विश्वासार्ह शिक्षण प्लॅटफॉर्मची निवड कशी करावी आणि आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी याविषयी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमातवाढत्या सायबर गुन्ह्यांवर आधारित जनजागृतीपर व्हिडिओ प्रदर्शित करण्यात आले.त्यानंतर सार्थक पानसरे यांनी तंत्रज्ञानाचे थेट प्रात्यक्षिक सादर करून कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर करून होणाऱ्या फसवणुकीचे वास्तव उपस्थितांसमोर उलगडून दाखविले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लवकरच प्रदर्शित होणाऱ्या मराठी चित्रपट ‘‘भूतम भयम‘‘ च्या कलाकारांची विशेष उपस्थिती. छाया कदम, करण सोनावणे,नील साळेकर, पुष्कराज चिरपूटकर, सौरभ घाडगे,मनमीत पेम,शुभम जाधव,सिद्धांत सरफरे, शोभिता कुडतडकर, प्रियदर्शन जाधव, सुहिता थत्ते आणि प्रताप फड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.

त्यांनी क्किक हिल सायबर वॉरस क्लबच्या कार्याचे कौतुक करत सुरक्षित डिजिटल जीवनशैली स्वीकारण्याचा संदेश दिला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.पी.डी. पाटील,सचिव डॉ.सोमनाथ पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील यांनी सायबर जागरूकता ही काळाची गरज असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा दूत म्हणून समाजात कार्य करावे,असे आवाहन केले.

तसेच क्किक हिल फौंडेशनचे अजय शिर्के, संत तुकाराम नगर पोलीस स्टेशनचे पीएसआय शशिकांत गाडेकर, पिंपरी-चिंचवड सायबर सेलचे एपीआय प्रवीण स्वामी,**AMDOCSPS** चे **Director of software Engineering** रविंदर पाल सिंह,**ANGLOWORKS** चे **Vice President-Human Resources** आशिष बांके,**BSCML News Channel** चे संपादक यशवंत गायकवाड,अँकर सौ.अनिता विरजदार,साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्राकाचे संपादक दत्तात्रय कांबळे तसेच दैनिक प्रभातचे पत्रकार जयदीप सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थित होते

उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व,डिजिटल जबाबदारी, कृत्रिम बुद्धिमत्तेचा सुरक्षित वापर आणि जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याची आवश्यकता अधोरेखित केली. सुरक्षित,जागरूक आणि सशक्त डिजिटल समाज घडविण्यासाठी अशा जनजागृती पर उपक्रमांची नितांत आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करत त्यांनी क्किक हिल फौंडेशनचे मनापासून कौतुक केले.

या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन व आयोजन मधील सर्व पदाधिकारी,सायबर वॉरियर्स, स्वयंसेवक आणि शिक्षक समन्वयक प्रा.सत्यवान कुंजीर यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले.

## खान्देश मराठा पाटील समाज संघ,पिंपरी-चिंचवड, पुणे यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com

**पिंपरी**-खान्देश मराठा पाटील समाज संघ,पिंपरी-चिंचवड, पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी ‘गुणवंत विद्यार्थी गुणगौरव समारंभ’ आकुर्डी येथील ग.दि.माडगूळकर नाट्यगृहात पार पडला.

पोलिस निरीक्षक(एसीबी,पुणे) गिरीश सोनवणे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.चिंचवडचे आमदार शंकर जगताप,कामगार कल्याण मंडळाचे केंद्र संचालक प्रदीप बोरसे,स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे,नगरसेवक चेतन भुजबळ आणि प्रख्यात जल अभ्यासक भिला पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि प्रतिमेच्या पूजनाने झाल्यानंतर,संस्थेचे संचालक व सल्लागार पंकज निकम यांनी प्रास्ताविकातून समाज संघातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला.

आमदार शंकरजगताप यांनी शिक्षण, शिस्त, सातत्यपूर्ण परिश्रम आणि ध्येयपूर्तीसाठी लागणाऱ्या जिद्दीचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय मनोगतात गिरीश सोनवणे यांनी विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाच्या बळावर प्रशासकीय सेवेमध्ये आपले करिअर घडवावे, असे आवाहन केले.

प्रदीप बोरसे यांनी कामगार कल्याण मंडळाच्या विविध शैक्षणिक योजना व शिष्यवृत्तींची माहिती दिली,तर भिला पाटील यांनी दहावी-बारावीनंतरचे उच्च शिक्षण,कौशल्य विकास आणि करिअरच्या नव्या वाटा याविषयी बहुमूल्य मार्गदर्शन केले.

या सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन करून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व गौरवपत्र देऊन गौरव करण्यात आला.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी खान्देश मराठा पाटील समाज संघाचे अध्यक्ष महेंद्र नारायण पाटील,कार्याध्यक्ष शरद पाटील, सचिव शंकर पाटील,उपाध्यक्ष शिवाजी पाटील,सल्लागार व उद्योजक पंकज निकम, संचालक मोतीलाल भामरे,प्रदीप शिरसाठ आणि देविदास पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर पाटील यांनी केले,तर उपस्थितांचे आभार कार्याध्यक्ष शरद पाटील यांनी मानले.समाज संघाचे पदाधिकारी,सभासद,पालक, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागाने हा गुणगौरव सोहळा अतिशय दिमाखात संपन्न झाला.

# आमदार अमित गोरखे यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर आयोजन समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची संकल्पना प्रेरणादायी-भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण




**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यानी पिंपरी विधानसभा मतदारसंघामध्ये आमदार अमित गोरखे यांनी आयोजित रक्तदान शिबिराचे उदघाटन केले यावेळी त्यांचा सत्कार आमदार अमित गोरखे यांनी अण्णाभाऊ साठे यांची पुर्णाकृती प्रतिमा देऊन केला,यावेळी आमदार शंकर जगताप,उमाताई खापरे आदी मान्यवर पदाधिकारी यावेळी उपस्थित होते**

**पिंपरी:-येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ औपचारिक कार्यक्रम न करता समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची संकल्पना आमदार अमित गोरखे यांची अत्यंत प्रेरणादायी आहे.असे मत भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी येथे सांगितले**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी विधानसभा मतदारसंघात आमदार अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचवड येथील नोवेल इंटरनॅशनल स्कूलमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

रवींद्र चव्हान यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन केले.चव्हाण पुढे म्हणाले की,रक्तदानासारख्या उपक्रमातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते.आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी मतदारसंघात आयोजित केलेले हे रक्तदान शिबिर सामाजिक बांधिलकी जपणारे आणि तरुणांना सेवाभावाची प्रेरणा देणारे आहे.अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो आणि सार्वजनिक जीवनातील लोकप्रतिनिधींनी समाजहिताला प्राधान्य दिल्याचे समाधान वाटते असे मत भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी येथे सांगितले.

मान्यवरांच्या उपस्थितीत शिबिराचे उदघाटन करण्यात आले. उदघाटनानंतर रवींद्र चव्हाण यांनी रक्तदात्यांशी संवाद साधत त्यांच्या उत्साहाचे कौतुक केले आणि अधिकाआधिक नागरिकांनी रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे,असे आवाहन केले.

याप्रसंगी भाजप प्रदेश महामंत्री राजेशजी पांडे,भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे,आमदार शंकर जगताप,आमदार श्रीमती उमाताई खापरे,उपमहापौर सौ.शर्मिला बाबर,राजेश पिल्ले,सभापती संजय नाना काटे,सभापती कैलास कुटे, नगरसेवक तुषार हिंगे,नगरसेवक शीतल शिंदे,नगरसेवक कुशाग्र कदम,नगरसेविका श्रीमती अनुराधा गोरखे,नगरसेविका सौ.सुप्रिया चांदगुडे,नगरसेविका सौ.शैलजा मोरे,नगरसेविका सौ.मधुरा शिंदे, प्रसाद शेट्टी,अमित बाबर,नेताजी शिंदे तसेच पिंपरी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिराला नागरिकांचा,युवक-युवतींचा प्रतिसाद मिळाला एकून ३०२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले.यावेळी आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी विधानसभा मतदारसंघातील ७ प्रभागांमध्ये अशाच प्रकारे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले,तसेच नगरसेविका श्रीमती अनुराधा-ताई गोरखे यांनी सर्व रक्तदाते, स्वयंसेवक आणि आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या कार्यकर्त्यांचे आभार मानत,समाजहितासाठी अशा उपक्रमांची परंपरा पुढेही सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

# गाडा रोड,ताथवडे येथील कचरा केंद्र स्थलांतरित केले नाही तर आंदोलन करणार-'शिवसेना पिं.चिं. शहर प्रमुख'चेतन पवार यांचा प्रशासनाला आवाहन

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com
संपर्क मो-९८६०८७७७८९

**चिंचवड:-**गाडा रोड,ताथवडे येथील कचरा संकलन केंद्रामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.गाडा रोड,ताथवडे येथील कचरा संकलन केंद्र स्थलांतरीत करण्यात यावे, या मागणीसाठी नुकतेच ताथवडे येथील विविध सोसायट्यांमधील शेकडो नागरिकांनी संघटीत होऊन आंदोलन केले.

जनआंदोलना मध्ये पिंपरी चिंचवड 'शिवसेना शहर प्रमुख'(उद्धव बाळासाहेब ठाकरे)पक्ष चेतन पवार यांनी सहभागी व उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

तसेच यावेळी चेतन पवार यांनी आंदोलनामध्ये सहभागी होऊन बोलताना सांगितले ताथवडे गाव-ातील एक हक्काचा सुजाण नागरिक म्हणून मी माझी भूमिका मांडली. पिपरी चिंचवड महापालिकेच्या संबधित विभागाच्या प्रशासनाला जाहीर इशारा देण्यात येत असून येत्या काही दिवसांत प्रशासनाने ताथवडे येथील कचरा संकलन केंद्रामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असल्याचा या गंभीर समस्येची दखल घेऊन कचरा केंद्र स्थलांतरित केले नाही,तर शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रशासनाला जागे करण्यासाठी



तीव्र लढा उभारेल. नागरिकांच्या आरोग्याशी खेळू देणार नाही व त्यांच्या न्याय हक्कासाठी सदैव पुढे येणार असल्याचे चेतन पवार यांनी सांगितले आहे.

सा.प्रगत भारत वृत्तपत्र १९ व्या वर्षात यशस्वी पदार्पणा निमित्त हार्दिक शुभेच्छा..!




# भारताच्या प्रगतीसाठी संशोधनावर लक्ष-पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील

## पीसीयू मध्ये आंतरराष्ट्रीय मास्टरमाइंड मीटचे उदघाटन




**पिंपरी:-**भारताच्या औद्योगिक, आर्थिक प्रगतीसाठी नवोपक्रम व संशोधनावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. आगामी काळात पिं-परी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) हे स्टार्टअप केंद्रित विद्यापीठ म्हणून विकसित करण्यात येईल. तसेच हरित ऊर्जा,हवामान बदल, शाश्वत शेती,कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक सहकार्य या क्षेत्रात संशोधन करून आव्हानांचे संधी मध्ये रूपांतर करून स्टार्टअपला चालनादिली जाईल.तसेच भारत जपान सहकार्य माध्यमातून विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार होण्यास मदत होईल असे प्रतिपादन पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिं-परी चिंचवड विद्यापीठात(पीसीयू) येथे 'आंतरराष्ट्रीयमास्टरमाइंड मीट (आयएम ३)२०२६' च्या उदधाटन प्रसंगी हर्षवर्धन पाटील बोलत होते.विकसित भारत २०४७ या संकल्पनेला संशोधन आणि नव उपक्रम या माध्यमातून गती देण्यासाठी आयोजित परिषदेत कुलगुरू डॉ.संतोष सोनवणे, संशोधन व विकास संचालक तसेच डॉ.भरत काळे,सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक डॉ.राजेंद्र जगदाळे,मायक्रोलिन (अमेरिका)चे संस्थापक डॉ. अशोक जोशी आणि युनिव्हर्सिटी ऑफ न्यूकॅसल,ऑस्ट्रेलिया येथील ग्लोबल इनोव्हेटिव्ह सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड नॅनोमटेरियल्सचे संचालक प्रा. अजयन विनू,मिड स्वीडन विद्यापीठाचे डॉ.कौस्तुभ दलाल,सेंट्रल इलेक्ट्रोकेमिकल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. विजय मोहनन पिल्लई,भारतीय विज्ञान संस्था,बेंगळुरू येथील प्रा. पी.एस.अनिल कुमार,टाटा केमिकल्सचे ग्लोबल हेड इनोव्हेशन डॉ.रिचर्ड लोबो,सी-डॅकचे डॉ. कृष्णांजन भट्टाचार्य,महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ.विलास खरचे, दक्षिण आफ्रिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ व्हेंडा येथील डॉ.फुलुफ्हेलो नेमांगवेले, भारतीय विज्ञान संस्थेचे डॉ.सचिन रोंडिया आदींसह देश विदेशातील नामवंत शास्त्रज्ञ,संशोधक, शिक्षणतज्ज्ञ,उद्योग प्रतिनिधी आणि धोरणकर्ते या परिषदेत सहभागी झाले होते.

यावेळी ॲबस्ट्रॅक्ट स्मरणिका प्रकाशित करण्यात आली.कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी विद्यापीठातील संशोधन,नवोपक्रम आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी उभारण्यात आलेल्या सक्षम परिसंस्थेची माहिती देत विद्यार्थी आणि संशोधकांनी समाजोपयोगी संशोधन करण्याचे आवाहन केले.प्रा.अजयन विनू यांनी कार्बन उत्सर्जन,हरित ऊर्जा,हायड्रोजनइंधन,स्वच्छ ऊर्जा आणि प्रगत नॅनोमटेरियल्स या विषयांवर मार्गदर्शन केले.तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. अशोक जोशी यांनी ज्ञानाचे आर्थिक मूल्यात रूपांतर करणारी प्रक्रिया म्हणजे नवोपक्रम असून, तो देशाच्या अर्थव्यवस्था वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले.सेंट्रल इलेक्ट्रोकेमिकल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा.विजय मोहनन पिल्लई यांनी ऊर्जा साठवणूक, द्विमितीय पदार्थ,इलेक्ट्रोकॅटलिसिस, लिथियम-आयन बॅटरी,बॅटरी कचरा आणि स्वच्छ ऊर्जेतील आव्हाने यावर मार्गदर्शन केले. प्रा.अजयन विनू यांनी प्रगत सच्छिद्र कार्बन आधारित पदार्थ, हायड्रोजन निर्मिती,कार्बन डायऑक्साइडनियंत्रण आणि पर्यावरणपूरक ऊर्जा उपाय यावरील संशोधन सादर केले.भारतीय विज्ञान संस्था,बेंगळुरू येथील प्रा. पी.एस.अनिल कुमार यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने क्वांटम पदार्थांचे अभियांत्रिकीतील संशोधन, मशीन लर्निंगचा वापर आणि आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी आवश्यक प्रगत पदार्थ विकास याविषयी माहिती दिली.टाटा केमिकल्सचे ग्लोबल हेड, इनोव्हेशन डॉ.रिचर्ड लोबो यांनी जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता,संशोधनातील नवे प्रवाह आणि २०३५ पर्यंतच्या तांत्रिक परिवर्तनाची माहिती दिली. मिड स्वीडन विद्यापीठाचे डॉ. कौस्तुभ दलाल यांनी आरोग्य सेवेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गुंतवणुकीचे आर्थिक मूल्यांकन, त्यातील आव्हाने आणि संधी स्पष्ट केल्या. सी-डॅकचेडॉ. कृष्णांजन भट्टाचार्य यांनी भाषा मॉडेल्स मधील डेटा करप्शन आणि त्यावरील उपाय याची माहिती दिली.महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. विलास खरचे यांनी अचूक शेती, पीक निरीक्षण, हवामान बदलाशी सुसंगत शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्मार्ट कृषी तंत्रज्ञान वापर याचे मार्गदर्शन केले.दक्षिण आफ्रिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ व्हेंडा येथील डॉ. फुलुफ्हेलो नेमांगवेले यांनी ब्लॉकचेन आधारित हरित ऊर्जा प्रणाली, ऊर्जा देवाण घेवाण, मशीन लर्निंग आधारित ऊर्जा अंदाज प्रणाली यावर सादरीकरण केले.भारतीय विज्ञान संस्थेचे डॉ. सचिन रोंडिया यांनी सौरऊर्जा निर्मितीसाठी प्रगत सेमिकंडक्टर पदार्थ, फोटोव्होल्टाइक तंत्रज्ञान आणि पुढील पिढीतील सौरऊर्जा संशोधनातील संधी याची माहिती दिली. ही आंतरराष्ट्रीय परिषद पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ.गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.प्रास्ताविक डॉ. भरत काळे यांनी केले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे मुखदर्शन




**पंढरपूर:आषाढी यात्रा सोहळ्यानिमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे मुखदर्शन घेतले. भाविकांची दर्शन रांगेत मोठी गर्दी असून त्यांना सुलभ व जलद दर्शन व्हावे, कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी उपमुख्यमंत्र्यांनी स्वतः मुखदर्शन घेऊन व्यवस्थेची पाहणी केली.**

यावेळी त्यांच्यासमवेत सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनीही श्रीविठ्ठल-रुक्मिणी मातेचे मुखदर्शन घेतले.**सत्कार व कामांचा आढावा:**मंदिर समितीच्या वतीने जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. गृहराज्यमंत्री योगेश कदम व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचाही मंदिर समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सत्कार केला.यावेळी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धनाचे काम सुरू असून, झालेल्या कामांची तसेच प्रस्तावित नवीन दर्शन मंडपाबाबत उपमुख्यमंत्र्यांनी माहिती घेतली.मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदिर जतन,संवर्धन व नवीन दर्शन मंडपाच्या कामाबाबतची सविस्तर माहिती दिली.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूर कॉरिडॉर बाबत नागरिकांशी चर्चा केली. व विश्वासात घेऊनच पुढील कार्यवाही करण्यात येईल,असे सांगितले.याप्रसंगी आमदार तानाजी सावंत,आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, नगराध्यक्षा प्रणिती भालके, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, प्रांताधिकारी सचिन इथापे, व्यवस्थापक प्रवीण कुमार घम आदी उपस्थित होते.